# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०५/२०२४ (सोमवार) सकाळ


---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक**

**वाहनासह एकुण ६,०५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक १८/०५/२०२४ चे २३/१० वा. ते २३/५० वा. दरम्यान पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे केळवद परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा शिवलॉन केळवद येथे ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने मौजा शिवलॉन केळवद येथे नाकाबंदी करून रेती वाहतुक करणारा ट्रॅक्टर क्र. एम. पी—२८/ए.सी ५७११ व लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— सुरेंद्र धनराज कातकडे, वय २८ वर्ष, रा. सावंगा (संगम) वार्ड क्र. १७ तह. सौसर जि. पांढुर्णा (एम.पी)** यानी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून महिंद्रा ट्रॅक्टर क्र. एम. पी—२८/ए.सी ५७११ व लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली किंमती ६,००,०००/— रू. व एक ब्रॉस रेती किमती ५,०००/— रू. असा एकुण ६,०५,०००/— रू. चा मुद्देमाल गौनखनीज विनापरवाना शासकीय संपत्तीची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोशि सैफुल्हा खलील अहमद पोस्टे केळवद यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन केळवद येथे **आरोपी चालक नामे— सुरेंद्र धनराज कातकडे, वय २८ वर्ष, रा. सावंगा (संगम) वार्ड क्र. १७ तह. सौसर जि. पांढुर्णा (एम.पी)** याचेविरूद्ध कलम ३७९ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर, पोहवा दिनेश काकडे, पोशि सैफुल्हा खलील अहमद यांनी पार पाडली.



**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक**
**वाहनासह एकुण १०,१५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक १९/०५/२०२४ चे ११.०० वा. ते १३.०० वा. दरम्यान पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे अरोली परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा धर्मापुरी ते रेवराल रोड येथे ट्रकद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने मौजा धर्मापुरी ते रेवराल रोड येथे नाकाबंदी करून रेती वाहतुक करणारा दस चक्का वाहन क्र. एम एच— ३६/एफ— ३९२१ चा चालक **आरोपी नामे— दिनेश सुदाम मोहनकर, वय २४ वर्ष, रा. खापा ता. तुमसर जि. भंडारा** यानी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून पिवळया रंगाचा दस चक्का वाहन क्र. एम एच— ३६/एफ—३९२१ किंमती १०,००,०००/— रू मध्ये ५ ब्रास रेती किंमती १५,०००/— रू असा एकुण **१०,१५,०००/— रू चा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **आरोपी चालक नामे— १) दिनेश सुदाम मोहनकर, वय २४ वर्ष, रा. खापा ता. तुमसर जि. भंडारा २) मालक नामे— गौरीशंकर सुधाकर शेंडे, वय ३० वर्ष, रा. खरबी ता. तुमसर जि. भंडारा** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि. निशांत फुलेकर, पोउपनि सोनवणे, पोहवा संदीप बाजनघाटे, पोशि मनिश सुखदेवे, पोशि शिलन वाघमारे, चालक नितेश देवांगन यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर